महाराष्ट्र शिक्षण सेवा (शिक्षण सक्षमीकरण शाखा) गट-अ मधील अधिकाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यामध्ये अंशत: बदल करण्याबाबत - प्राचार्य

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन आदेश क्रमांक : बदली ३११९/प्र.क्र.३९/प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ११ जुलै, २०१९

<u>वाचा</u> :- शासनाचे समक्रमाकांचे दिनांक २९ मे, २०१९ रोजीचे शासन आदेश

शासन आदेश-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मे, २०१९ रोजी तीन वर्षाचा कालावधी पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश दिनांक २९ मे, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. त्यामध्ये श्रीमती कमलादेवी श्रीधर आवटे, प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, पुणे यांची बदली प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, ठाणे या पदावर बदली करण्यात आली आहे. श्रीमती कमलादेवी श्रीधर आवटे यांची विनंती विचारात घेऊन, दिनांक २९ मे, २०१९ रोजीच्या आदेशान्वये करण्यात आलेली त्यांची बदली रद्द करण्यात येऊन, त्यांना प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, पुणे या पदावर १ वर्षासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

२. सदर आदेश सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहेत.

३. आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी दिनांक २९ मे, २०१९ रोजीच्या आदेशाप्रमाणे सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या सध्याच्या पदावरून कार्यमुक्त करण्याचे आदेश निर्गमित केले असल्यास, ते रद्द करण्यात यावे. संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या मूळ पदावर मुदतवाढ देण्याबाबत यथोचित आदेश निर्गमित करावेत व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

४. श्रीमती कमलादेवी श्रीधर आवटे, प्राचार्य ह्या शासन आदेश दिनांक २९ मे, २०१९ अन्वये करण्यात आलेल्या बदलीच्या ठिकाणी म्हणजेच जिल्हा शैक्षणिक सात्तत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, ठाणे येथील प्राचार्य पदावर रूजू झाले असल्यास हे आदेश अंमलात येणार नाहीत.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१११५५०५६४७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUSHIL KHODWEKAR

Digitally signed by SUSHIL KHODWEKAR
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=1c4a8f0aafeac0a009d462f7f02d23942001d76225b9f704de26731171c8684b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=19b0ccbee5810aa5e36e9fa467a7630471d3c500ceb353fbb37bf0b6dfe0407a, ou=SCHOOL EDUCATION AND SPORT DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUSHIL KHODWEKAR
Date: 2019.07.11 16:13:52 +05'30'

(सुशिल खोडवेकर, भा.प्र.से.)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, शिक्षण आयुक्तालय (मध्यवर्ती इमारत),महाराष्ट्र राज्य, पुणे
२) जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे / ठाणे
३) सर्व शिक्षण संचालक
४) विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई / पुणे
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई / पुणे
६) संबंधित शिक्षणाधिकारी
७) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
८) संबंधित अधिकारी (आयुक्त (शिक्षण) यांचे कार्यालयामार्फत)

प्रत माहितीसाठी,

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी.
२) अप्पर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक
३) निवडनस्ती, प्रशा-२.